# अधिसूचना

क्र.कलि./उपजि/भूसप./कानाप्र/कावि 39/2019
जिल्हाधिकारी नागपूर यांचे कार्यालय
नागपूर, दिनांक–15/3/2019

भुमिसपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या नागपूर जिल्हयाच्या जिल्हाधिका–याने भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 (2013 चा 30) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) यांच्या कलम 11 च्या पोट कलम (1) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक 35 दिनांक 31/05/2018 अन्वये प्रारंभिक अधिसुचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनूसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे. किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थि, नागपूर जिल्हाधिका–याने, कलम 15 च्या पोट कलम (2) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम 19 च्या पोटकलम (1) च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका–यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी भूसंपादन कान्होली नाला प्रकल्प नागपूर यास पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूचि एक

### जमीनीचे वर्णन

भू.प्र.कं. 6/अ–65/2017–2018

गावाचे नाव **पारडी** तालुका **कुही** जिल्हा नागपूर प.ह.नं. **70**

| **अ.कं.** | **सर्व्हे कं. किंवा गट कं.** | **संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) हे.आर. मध्ये** |
|---|---|---|
| 1 | 302/2 | 0.38.00 |
| **एकुण** | | **0.38.00** |

## अनुसूचि–दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाचे विवरण

| | |
|---|---|
| प्रकल्पाचे नाव – | सायकी मकरधोकडा प्रकल्प |
| प्रकल्पकार्याचे वर्णन– | सायकी मकरधोकडा प्रकल्प अंतर्गत पंचखेडी लघु कालव्याच्या कामाकरिता |
| प्रकल्पाचे समाजाला मिळणारे फायदे – सोयीसुविधा याबाबत व इतर लाभासंबंधात) आर्थिक रोजगार, पायाभूत सुविधा व इतर | सायकी मकरधोकडा प्रकल्प या प्रकल्पामुळे निव्वळ 2916 हे. आर क्षेत्रात सिचंनाचे लाभ प्राप्त होणार आहेत प्रकल्पाचे सुधारीत लाभव्यय परिणाम 2.13 आहे |

## अनुसूचि–तीन

(पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन.)

विस्थापन होत नसल्याने – निरंक –

## अनुसूचि–चार

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

–निरंक–

टिप : उक्त जमिनीचे नकाशे भूसंपादीत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) कान्होली नाला प्रकल्प नागपूर यांच्या कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

ठिकाण :– नागपूर

दिनांक :– 13 /3 / 2019

जिल्हाधिकारी, नागपूर.